झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.
जा.क्र.झोपुप्रा/तां.४/प्र.क्र.१६५/झोनिआ/७५७९/१४.
दिनांक :– ९ / ९/२०१४.

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो. - २००४ / प्र. क्र. - २१३ / झो. प. सु. -१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतूदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करणेत आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. पलाश रियलटर्स यांचेतर्फे आर्किटेक्ट श्री. जगदीश देशपांडे यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२५/०५/२००७ रोजी विनंती केलेली आहे. अनुसूचीमध्ये नमुद केलेली मिळकत मे. पलाश रियलटर्स तर्फे भागीदार श्री. संजय नारायण जालान व श्री. अमित प्रमोद खिंवसरा यांनी हवल-१०/०४७२७/२००५ दि.२५/०७/२००५ चे नोंदणीकृत दस्तऐवजान्वये खरेदी केली असून मिळकतपत्रिकेवर फेरफार क्रमांक ६४९ अन्वये त्यांची नावे दाखल झालेली आहेत.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४(१) नुसार गलिच्छ वस्ती क्षेत्र असलेबाबत सक्षम अधिकारी व महापालिका सहाय्यक आयुक्त (ग.व.नि.), पुणे महानगरपालिका यांनी आदेश निर्गमित केला असून तो महाराष्ट्र शासनाच्या दि.०६/०४/१९९५ रोजीच्या राजपत्रात पान क्र.६४६ वर प्रसिद्ध झालेला आहे.

आणि ज्याअर्थी, उपआयुक्त विभागीय कार्यालय क्रमांक १, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर एकूण ५८ झोपड्या असून त्यापैकी पात्र निवासी झोपडीधारकांची संख्या ४४, पात्र बिगरनिवासी झोपडीधारकांची संख्या ०२ आहे. पात्र (झोपडीधारकांपैकी ७०% झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसकास संमती दिलेली आहे.)

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ११(१) अन्वये अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' असलेबाबतचा आदेश सक्षम अधिकारी व नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी त्यांचे कार्यालयाकडील आदेश क्र.५३/११(१)/०१ दि.०५/११/२००३ रोजी निर्गमित केला असून तो दि.१३/११/२००३ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध केलेला आहे. त्याचप्रमाणे दि.१७/११/२००३ रोजीच्या महाराष्ट्र 'हेरॉल्ड' व दैनिक 'संध्यानंद' या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेत आला आहे.

आणि ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) अन्वये घोषित क्षेत्रे ही पुनर्वसन क्षेत्र असलेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जा.क्र.झोपुप्रा/क.अ.तां./झोपुआ/२५७/२०१४. दि.१०/०२/२०१४ अन्वये घोषित केले असून उपरोक्त आदेश महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात भाग १, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०१४, चे राजपत्रात पृष्ठ क्रमांक २६, २७ व २८ वर प्रसिद्ध करण्यात आलेला असलेमुळे अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र असलेचे घोषित झालेले आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबतचा झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र आदेश, तसेच झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहीत पद्धतीने प्रसिद्ध झालेनंतर विहीत कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपड्या पाडून जमिन खुली करणे आवश्यक आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे
माहिती अधिकाराखाली दिलेली प्रत

(कृ.मा.पहा)

त्याअर्थी मी, कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे. उपरोक्त अधिनियमाचे कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' म्हणून घोषित करीत आहे. अनुसूचीमध्ये नमुद क्षेत्रातील सर्व झोपडया / बांधकामे संबंधितांनी हा आदेश प्रसिध्द झालेपासून ६ (सहा) आठवडयाच्या आत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे. अन्यथा अनुसूचीमधील नमूद क्षेत्रातील सर्व झोपड्या /बांधकामावर अधिनियमाच्या ३ड सह १२(८) अन्वये कार्यवाही करणेत येईल. सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

१. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करून प्रत्यक्ष बांधकाम सुरू केले पाहिजे.

२. विकसकाने योजनेचे काम चालू करण्यापूर्वी विस्थापित होणाऱ्या पात्र लाभार्थींची राहण्याची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक सर्व सुविधांसह स्वखर्चाने केली पाहिजे.

३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण केले पाहिजे.

४. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळ्यांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.

५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारून मुदतवाढ देणेत येईल.

६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसल्यास विकसकावर उक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करणेत येईल.

७. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा /गाळ्यांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबिर रिकामे केले पाहिजे.

८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेंतर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झालेपासून ०४ (चार) आठवड्यांच्या आत उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ. मी.) | चतु:सिमा (नगरभूमापन अधिकारी क्र.१, पुणे यांचे कार्यालयाकडील नमू१/पमु३/अतिसत्वर/मो.र.नं.६५६२/०८ दि.११/०३/२००८ रोजीच्या मोजणी नकाशाच्या 'क' प्रतीवरुन) |
|---|---|---|
| फा.प्लॉ.क्र.५६०, भांबुर्डा, पुणे. | २२०३ चौ.मी. (घोषित क्षेत्रापैकी रस्त्याकरीता संपादीत करणेत आलेले क्षेत्र वगळुन) | पुर्व :- लागु फा.प्लॉट क्र.५५१+५५२/४, लागु फा.प्लॉट क्र.५५१+५५२/५, रस्ता. |
| | | पश्चिम :- लागु फा.प्लॉट क्र.५६० चे उर्वरीत क्षेत्र व रस्ता. |
| | | उत्तर :- लागु फा.प्लॉट क्र.५५९. |
| | | दक्षिण :- लागु फा.प्लॉट क्र.५६१ व ५६१/२/८. |

सदर योजनेसंबधीची सर्व कागदपत्रे संबंधीतांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- / /२०१४.

(कुणाल कुमार)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे
माहिती अधिकाराखाली दिलेली प्रत

G:\Nirmulan adesh.doc 6